**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ६००४/२०२५.**
**निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकवीस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.११, कोल्हापूर यांचे न्यायालयात .

| | | |
|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक २५/१०/२०२४ वेळ ०१–४८ वाजता महानगरपालिका, कोल्हापूर |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | २५/१०/२०२४ |
| ३ | फिर्यादीचे नाव व पत्ता | महाराष्ट्र शासन, लक्ष्मीपूरी पोलिस स्टेशन, कोल्हापूर |
| ४ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | **रघुनाथ सायबा केसरकर**, वय ५८ वर्षे, रा. हरीओमनगर, कोल्हापूर |
| ५ | आरोपीला समजावून सांगणेचा तपशील | महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३३(डब्ल्यू) प्रमाणे |

गुन्ह्याचा तपशिल

१) वरील तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमचे महालक्ष्मी टी स्टॉल नावाची आस्थापना सक्षम अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या वेळेच्या परवान्याचा भंग करुन वेळेपेक्षा जास्त वेळ/कालावधीकरीता चालू ठेवले म्हणून तुम्ही महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३३(डब्ल्यू) खालील दंडनीय गुन्हा केला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

आरोपीस आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर **होय**

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय?

उत्तर **होय**

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर **मला गुन्हा कबूल आहे.**

आरोपीची सही

समोर,

(श्रीमती पंकज बी. राजपुत)
लोक अदालत पॅनेल प्रमुख
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(कोर्ट क्र.११), कोल्हापूर

दिनांक १४/०३/२०२६
ठिकाण – कोल्हापूर

## <u>न्यायनिर्णय</u>

## <u>(दिनांक १४/०३/२०२६)</u>

आजरोजी सदरचे प्रकरण राष्ट्रीय लोकन्यायालयात ठेवणेत आले. सदरचा गुन्हा आरोपीने पहिल्याच तारखेला स्वेच्छेने कबूल केला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने असे कथन केले की, आर्थिक परिस्थिती गरीबीचे असलेने कमीत कमी शिक्षा व्हावी. त्यामुळे अशा परिस्थितीत आरोपी यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप पाहता आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना दयाबुध्दी दाखविणे संयुक्तीक होणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) आरोपीस **रघूनाथ सायबा केसरकर** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२(भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५) अन्वये महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३३(डब्ल्यू) प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून त्यांना रक्कम रुपये **२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त )** दंड व दंड न दिल्यास (२) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

२) आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देणेत यावी.

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.03.16 11:57:27 +0530

ठिकाण – कोल्हापूर
दिनांक १४/०३/२०२६

(श्रीमती पंकज बी. राजपुत)
लोक अदालत पॅनेल प्रमुख
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(कोर्ट क्र.११), कोल्हापूर